महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

सोमवार ❖ ०९ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६४ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

# शिंदे गटाच्या दोन मंत्र्यांना मंत्रीमंडळातून डच्चू?

## भरत गोगावले, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, अर्जुन खोतकर, विजय शिवतारे मंत्रिपदाच्या शर्यतीत



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

मुंबईः शिवसेना आमदार आणि मंत्र्यांचा प्रगती पुस्तक तयार झाले आहे. दोन मंत्र्यांचे पत्ते कट होण्याची शक्यता वर्तवली आहे. तर पाच जणांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर आमदार संजय राठोड आणि आमदार अब्दुल सत्तार यांचा पत्ता कट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर भरत गोगावले, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, अजून खोतकर, विजय शिवतारे यांना मंत्रिपद मिळेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. महायुतीमध्ये शिवसेनेला १३ ते १४ मंत्री पद मिळण्याची शक्यता आहे.

या आमदारांना संधी मिळण्याची शक्यता यामध्ये अब्दुल सत्तार आणि संजय राठोड यांना पुन्हा मंत्रीपद मिळणार नाही, अशी शक्यता वर्तवली जात आहे. तर ओवळा मजिवडा मतदारसंघाचे आमदार प्रताप सरनाईक, जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर, महाडचे भरत गोगावले, पुरंदरचे आमदार विजय शिवतारे आणि औरंगाबाद पश्चिमचे आमदार संजय शिरसाट यांची यावेळी मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान आमदार संजय राठोड यांनी एबीपी माझाशी बोलताना पक्षाचे प्रमुख पान ४ वर ▶▶



# शहापूर तालुक्यात खैरांची बेकायदा कत्तल

## वनविभागाचे दुर्लक्ष

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** दुर्मिळ वनसंपदा असल्याने त्याची तोड करण्यास अथवा विक्री करण्यास बंदी असलेल्या खैराची बेकायदेशीर तोड करून लाखो रुपयांच्या सरकारी महसुलाला चुना लावल्याची घटना शहापूर तालुक्यातील शहापूर वन क्षेत्रात स्थानिक शेतकऱ्यांच्या जागरूकतेमुळे समोर आली आहे. मात्र याबाबत वन परीक्षेत्र अधिकाऱ्यांना काहीच माहिती नसल्याचे समोर आल्याने याचा नेमका अर्थ काय घ्यायचा, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. कधी काळी विपुल वनसंपत्ती असलेल्या झाडांना नष्ट करण्याचा विडा जंगल माफियांनी वन अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने उचलला आहे की काय, अशी शंका येऊ लागली आहे. शहापूर वनविभागामधील शहापूर वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात खैर झाडे आहेत.

या पूर्वी शहापूर वनाधिकारी, वनपाल व वनरक्षक यांनी अवैध खैर वृक्ष तोड यावर नियंत्रण मिळवून अनेक आरोपी व वाहने जप्त केली होती. परंतु सद्या शहापूर वन क्षेत्राअंतर्गत शेरा, दहागाव, टहारपूर या वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात खैर वृक्षतोड झाली असून सदरचा खैर पडघा- बोरिवली येथे निर्यात केला असल्याची चर्चा सुरू असून वन क्षेत्रात होणारी होणारी अवैध वृक्ष तोड पर्यावरण प्रेमींसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

# शाळेचे काम अर्धवट ! बिल काढून ठेकेदार पसार

## अपूर्ण इमारतीचे काम पूर्ण झाल्याचा दाखला न देता कंत्राटदाराला पूर्ण देयक अदा केल्याचा धक्कादायक प्रकार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ पालघर प्रतिनिधी**

कासा, ता. ८ : डहाणू तालुक्यातील ओसरविरा गोरखनपाडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामात अनियमितता आढळल्याने प्रशासनावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अपूर्ण इमारतीचे काम पूर्ण झाल्याचा दाखला न देता कंत्राटदाराला पूर्ण देयक अदा केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

गोरखनपाडा शाळेची जुनी इमारत धोकादायक झाल्यामुळे २०२२-२३ मध्ये नवीन इमारतीसाठी मंजुरी मिळाली होती, मात्र डिसेंबरपर्यंत इमारतीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. दरवाजे, खिडक्या आणि इतर मूलभूत सुविधा अद्याप बसवलेल्या नसतानाही संबंधित कंत्राटदाराला बिल मंजूर करण्यात आले. पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनेक जिल्हा परिषद शाळा जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत आहेत. मंजूर कामे वेळेत पूर्ण होत नसल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सध्या शाळेत पहिली ते पाचवीचे एकूण १३४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जुनी इमारत जीर्ण अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवीन इमारत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता; मात्र कंत्राटदाराकडून कामाला होत असलेला विलंब आणि प्रशासनाकडून काळजी घेतली नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अद्याप कायम आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. स्थानिकांच्या दबावामुळे कामाला काहीसा वेग मिळाला असला तरी या प्रकरणी सखोल चौकशी होण्याची गरज आहे.

> **शाळेची पाहणी केली असता अजूनही येथील काम अपूर्ण अवस्थेत आहे. शाळेच्या अपूर्ण कामाबाबत शाळांना हरकत समितीचे पत्र, मुख्याध्यापकांचे पत्र किंवा ग्रामपंचायतीची ताबा पावती जोडलेली नाही. दोषींवर कारवाई करावी.**
> **- स्वाती राऊत, पंचायत समिती सदस्य**

> **गोरखनपाडा शाळेच्या नवीन इमारतीच्या कामात भ्रष्टाचार दिसून येतो. ५ डिसेंबरला भेट दिली असता अनेक कामे अपूर्ण असल्याचे आढळले. याबाबत चौकशी होणे गरजेचे आहे.**
> **- विपुल राऊत, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, डहाणू**

# आदित्य ठाकरेंचे समाजवादीवर टीकास्त्र

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या विधीमंडळाचं विशेष अधिवेशन सुरु आहे. मात्र अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला. महाविकास आघाडीच्या घटकपक्षांनी पहिल्याच दिवशी शपथविधीवर बहिष्कार टाकला होता. मात्र समाजवादी पार्टीचे अबू आझमी यांनी मात्र वेगळी भूमिका घेतली. त्यांनी मविआच्या भूमिकेशी फारकत घेत, पहिल्याच दिवशी शपथविधी घेतला. तसेच त्यांनी मविआतून बाहेर पडण्याचे देखील संकेत दिले. शिवसेनेसारख्या (यूबीटी) हिंदुत्ववादी पक्षासोबत आपण राहू शकत नाही, असं वक्तव्यही अबू आझमी यांनी केलं.

शनिवारी घडलेल्या सगळ्या प्रकारावर आता ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी अबू आझमी यांना प्रत्युत्तर दिलं आहे. अबू आझमी हे भाजपची बी टीम असल्याचं वक्तव्य आदित्य ठाकरे यांनी केलं. तसेच त्यांनी शिवसेनेची हिंदुत्वाबाबतची भूमिका देखील स्पष्ट केली. ते रविवारी विधानभवन परिसरात पत्रकारांशी संवाद साधत होते.

यावेळी अबू आझमी यांच्या भूमिकेविषयी विचारलं असता आदित्य ठाकरे म्हणाले, 'मी त्यांच्याबद्दल फार बोलू इच्छित नाही. राज्यातील समाजवादी पार्टीचे नेते भाजपची बी टीम म्हणून काम करत आहेत. अखिलेश यादव आपली लढाई लढत आहेत. पण पान ४ वर ▶▶



# शरद पवारांनी पराभव मान्य करावा - चंद्रशेखर बावनकुळे



**"शरद पवारांचा आम्ही सन्मान करतो : पण.....**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

शरद पवार यांनी मतांची संख्या सांगत आम्हाला मतं जास्त मिळाली तरी जागा कशा काय कमी आल्या हा प्रश्न उपस्थित केला आहे. शरद पवारांनी त्यासाठी एक गणितच मांडलं. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा निवडणूक निकालाचं गणित मांडूनच शरद पवारांना उत्तर दिलं. आता आज भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शरद पवारांनी अपयश झाकण्यासाठी असा खोटारडेपणा करु नये असं म्हटलं आहे. शरद पवार पत्रकार परिषदेत म्हणाले, काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, तर त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख एवढे मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत.'

शरद पवार यांचा आम्ही सन्मान करतो पण त्यांनी या वयात असा खोटारडेपणा करणं योग्य नाही. पराभव झाल्यावर तो स्वीकारायला हवा होता. पण पराभव स्वीकारता येत नाही म्हणून जनतेला कन्फ्युज करण्याचं आणि आपलं अपयश लपवण्याचं काम हे शरद पवार करत आहेत अशी टीका चंद्रशेखर पान ४ वर ▶▶

# विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकरच !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

मुंबई - विधानसभा अध्यक्षपदी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांची निवड होण्याची शक्यता आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राहुल नार्वेकरांनी अध्यक्षपदासाठी अर्ज भरला. महाविकास आघाडीकडून कुणीही अध्यक्षपदासाठी अर्ज न भरल्याने नार्वेकर बिनविरोध निवडून येण्याची शक्यता आहे त्यामुळे नार्वेकरांच्या निवडीची केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे. मागील २ दिवसांपासून विधानसभेचे विशेष अधिवेशन सुरू असून त्यात नवनिर्वाचित



आमदारांचा शपथविधी पार पडला. आज ८ डिसेंबरला दुपारी १२ वाजेपर्यंत विधानसभा अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत होती. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत राहुल नार्वेकरांनी विधिमंडळ सचिवांकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. दिलेल्या मुदतीत केवळ राहुल नार्वेकरांचा उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने उद्या ९ डिसेंबरला अधिवेशनात राहुल नार्वेकर यांच्या नावाची औपचारिक घोषणा होणार आहे. पान ४ वर ▶▶




# ठाणे, भिवंडी मीरा-भाईंदर महापालिकांना वाढीव पाणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे, भिवंडी-निजामपूर मीरा-भाईंदर या महापालिका क्षेत्रांना पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरणाने पाणी उचल क्षमता वाढवण्यासाठी नवीन पंप हाऊसच्या बांधकामा बरोबरच नवीन जलवाहिनी टाकण्याचा निर्णय घेतला आहे. या कामाचा शुभारंभ नुकताच ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते झाला. हे काम दिड वर्षात पुर्ण करण्याच्या सुचना राव यांनी दिल्याने ठाणे, भिवंडी, मीरा-भाईंदरला येत्या दिड वर्षात वाढीव पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे, भिवंडी-निजामपूर आणि मीरा-भाईंदर या महापालिका क्षेत्रात स्टेम प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे हा पाणी पुरवठा अपुरा पडू लागल्याने टंचाईची समस्या निर्माण होते. तसेच जुन्या यंत्रणेमुळे स्टेम प्राधिकरणाला नदी पात्रातून वाढीव पाण्याचा उपसा करणे शक्य होत नाही. या पार्श्वभूमीवर ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस आणि १२ किलोमीटरची नवीन जलवाहिनी टाकण्याचा निर्णय स्टेम प्राधिकरणाने घेतला आहे. मूलभूत सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष तरतुदी अंतर्गत महापालिकांना राज्य शासनाकडून अनुदान मिळते. त्याअंतर्गत, स्टेम प्रकल्पाची पाणी उचल क्षमता पान ४ वर ▶▶



# पेण अर्बन बँक ठेवीदारांना १४ वर्षानंतर मोठा दिलासा




❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**पेण (प्रतिनिधी)** पेण को-ऑफ अर्बन बँकेत तत्कालीन चेअरमन आणि संचालक मंडळाने केलेल्या आर्थिक घोटाळयांतर्गत ठेवीदारांच्या पैशातून खरेदी केलेल्या ४८० कोटींच्या जमीनी व मालमत्ताचा लिलाव करून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करावे असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने ७ ऑक्टोबर २०१६ रोजी दिला होता. या आदेशाला सक्त वसुली संचालनालयाने (ईडी) सर्वोच्च न्यायालयात आव्हान देऊन हरकत घेवून, स्थगीती मिळविली होती, मात्र सर्वसामान्य ठेवीदारांच्या हिता आड ईडीने येऊ नये अशी विनंती ठेवीदारांच्या वकिलांनी न्यायालयात वारंवार केली होती. अखेर ३ डिसेंबर रोजी सक्त वसुली संचालनालयाने सर्वोच्च न्यायालयात आपली हरकत मागे घेतली आहे. परिणामी त्या जमीनी व मालमत्तांचा लिलाव होऊन आता ठेवीदारांचे पैसे परत मिळण्याच्या प्रक्रीयेस गती मिळेल. अशी माहिती ठेवीदार संघर्ष समीतीचे अध्यक्ष नरेन जाधव यांनी बोलताना दिली .

पेण अर्बन बँकेचा तब्बल ७५८ कोटी रुपयांचा घोटाळा सन २०१० मध्ये उघडकीस आला, त्यास आता १४ वर्ष झाली. १ लाख ९८ हजार ठेवीदारांच्या ७५८ कोटी रुपयांच्या ठेवी अडकून पडल्या आहेत. १४ वर्षाच्या या कालावधीत अनेक ठेवीदारांचा मृत्यू देखील झाला. ठेवीदार संघर्ष समीतीने विविध स्थरावर आपल्या ठेवी परत मिळण्यासाठी लढा दिली. मुंबई उच्च न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली परंतू अद्याप पर्यंत १० हजार व २५ हजार रुपये ठेवी असलेल्या २३ हजार ठेवीदारांव्यतिरिक्त कोणत्याही ठेवींचे पैसे परत मिळाले नाहीत. ४८० कोटी रुपयांचे कर्ज मिनरल स्क्रॉप ट्रेडींग कॉर्पोरेशन (एमसीटीसी) कडून घेतले. त्या कर्जाच्या परत फेडीसाठी ठेवीदारांच्या पैशाचा वापर करण्यात आला. आणि याच ४८० कोटी रुपयातून पनवेल पेण, पाली-सुधागड, रोहा, राजस्थान आणि अरब देशांत जमीनी व अन्य मालमत्ता खरेदी केल्याचे सीबीआयच्या तपासात समोर आले. त्यावर मुंबई उच्च न्यायालयाने ठेवीदार हित संरक्षण कायद्यान्वये या मालमतांचा लिलाव करुन ठेवीदारांचे पैसे परत देण्याचा आदेश ७ ऑक्टोबर २०१६ रोजी दिला होता.

मुंबई उच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर, ईडीने ही मालमत्ता सरकारची असल्याचा दावा करून त्यावर सर्वोच्च न्यायालयातून स्थगिती मिळवली. मात्र ३ डिसेंबर रोजी ठेविदारांचे हित लक्षात घेऊन आपली हरकत मागे घेतल्याने ठेविदारांना गेल्या १४ वर्षात ठेविदारांच्या बाजूने न्याय मिळाला आहे. मात्र लढाई संपली नसल्याची भावना अनेक खातेदारांनी व्यक्त केली.

तपास आता प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे मालमत्ता विक्री करिता मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये पेण उप विभागीय महसूल अधिकारी हे प्राधिकृत अधिकारी आहेत. आता या मालमत्ता शोधून त्यांच्या लिलावाची कायदेशीर प्रक्रीया सुरु करावी लागणार आहे. ही प्रक्रीया जितक्या लवकर पूर्ण होईल, तितक्या लवकर या ४८० कोटी रुपयांतून ठेवीदारांना पैसे मिळू शकणार आहेत. परिणामी आता ठेवीदार कृती समितीला प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा लागणार असल्याचे ठेवीदारांनी बोलताना सांगीतले.

# १० ते १७ डिसेंबर दरम्यान आगरी महोत्सवाचे आयोजन




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे लोकमान्यतेस पात्र उरलेल्या आगरी युथ फोरम या सेवाभावी संस्थेच्या वतीने सन २००४ पासून 'अखिल भारतीय आगरी महोत्सव' या समाज सोहळयाचा आयोजनात सुरुवात केलेली आहे. कल्याण डॉंचिवलीकरच नाही तर ठाणे, रायगड, मुंबईवासियसु?द्धा आगरी महोत्सवची चालकासारखी वाट पाहत असतात. असा २०वा अखिल भारतीय आगरी महोत्सव यंदा १० ते १७ डिसेंबर या कालावधीत श्रीसंत सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल डोंबिवली पूर्व येथे संपन्न होणार असल्याची माहिती आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे यांनी पत्रकार परिषदेत दिली.


या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्राचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी १० डिसेंबर रोजी सायंकाळी संपन्न होणार आहे. या उदघाटन सोहळयासाठी समाजातील ज्येष्ठ नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. हा महोत्सव विधानसभा व लोकसभेच्या हिवाळी अधिवेशन काळात होत असल्याने असल्याने सर्व लोकप्रतिनिधी हे महोत्सव कालावधीमध्ये आगरी महोत्सव ला शुभेच्छा भेट देणार आहेत. अखिल भारतीय आगरी महोत्सव म्हणजे 'एक आनंदाची पर्वणी' या आनंदाच्या पर्वणी मध्ये मनमुराद आनंद लुटण्यासाठी प्रचंड जनसागर उसळण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन महोत्सव मध्ये भेट देणाऱ्या आबालवृद्धांना, महिलांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये. खरेदीसाठी येणाऱ्यांना मनपसंत वस्तूंच्या खरेदीचा आनंद घेता यावा, संगीत नृत्य प्रेमींना आगरी कोळी ठसकेबाज गीतांवरील नृत्याचा मनमुराद आनंद लुटता यावा, खवय्यांना स्वादिष्ट आगरी कोळी खा?द्यपदार्थावर मनसोक्त ताव मारता यावा, बच्चे कंपनी बरोबर त्यांच्या पालकांनाही आकाश पाळण्यात बसून आकाशा एवढा आनंद घेता यावा, त्यांच्या आनंदामध्ये बाधा येऊ नये म्हणून महोत्सव समितीने अत्यंत नियोजनबद्ध अशी कार्यक्रमांची आखणी केलेली आहे.

# "मी ऐकलं नाही... मला माहीत नाही"

## बांगलादेशातील हिंदूंवरील हिंसाचारावर फारूक अब्दुल्लांचं धक्कादायक विधान!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

बांगलादेशमधील सत्तांतरानंतर तिथल्या अल्पसंख्याकांवरील अत्याचाराच्या, त्यांच्याविरोधात होत असलेल्या हिंसाचाराच्या बातम्या समोर येत आहेत. आंतरराष्ट्रीय माध्यमं देखील सातत्याने त्याची दखल घेत आहेत. भारतातील नेते तिथे होत असलेल्या घटनांचा निषेध करताना दिसतायत. तर, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बांगलादेशमधील हिंदूंची स्थिती नाजूक असल्याचं म्हणत तिथे शांतीसेना पाठवण्याची मागणी केली आहे. मात्र, बॅनर्जी यांचे इंडिया आघाडीतील सहकारी, नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख तथा जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांनी एक धक्कादायक वक्तव्य केलं आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधिंनी फारुक अब्दुल्ला यांना बांगलादेशमध्ये अल्पसंख्याकांविरोधात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल प्रतिक्रिया विचारली असता फारुक अब्दुल्ला म्हणाले, 'मी काही ऐकलं नाही, मला काही माहिती नाही'. अब्दुल्ला यांच्या या वक्तव्याचं सर्वांनाच आश्चर्य वाटलं आहे. फारुक अब्दुल्ला म्हणाले, 'मला तिथलं काही माहिती नाही, मी काहीही ऐकलेलं नाही. त्यामुळे मी त्यावर कोणतीही टिप्पणी करणार नाही. तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींना विचारा. तिथल्या स्थितीबद्दल तुम्ही मोदींना विचारायला हवं'.




**काय म्हणाले फारूख अब्दुल्ला?**

बांगलादेशातील हिंदूवरील हिंसाचारावर जेकेएनसीचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला म्हणाले, 'मी यासंदर्भात ऐकले नाही, मला माहित नाही, यामुळे मी यावर भाष्य करणार नाही. यासंदर्भात आपण पंतप्रधानांना विचारायला हवे.' तत्पूर्वी, बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्यांदरम्यान देशाच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मुहम्मद युनूस यांनी धार्मिक गुरुंची भेट घेतली होती. यानंतर, अल्पसंख्यकांवर होणाऱ्या हल्ल्यांसंदर्भात अचूक माहिती मागवली होती.

**बांगलादेशात शांतिसेना पाठवावी! ममता बॅनर्जी यांची मागणी**

'बांगलादेशमधील सध्याच्या घडामोडी पाहता केंद्र सरकारने संयुक्त राष्ट्रांकडे (यूएन) बांगलादेशात शांतिसेना (पीसकीपिंग मिशन) तैनात करण्याची विनंती करावी, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथे छळ होणाऱ्या भारतीयांना परत आणण्यासंबंधी हस्तक्षेप करावा', अशी मागणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी केली.

**म्हणून मला बोलावं लागतंय : ममता बॅनर्जी**

'बांगलादेशमधील सध्याच्या घडामोडींवर भारताची भूमिका परराष्ट्रमंत्र्यांनी संसदेत मांडावी', अशीही मागणी ममता बॅनर्जी यांनी केली. बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालच्या विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या सत्राला संबोधित करताना ही मागणी केली. "भारत व बांगलादेशच्या द्विस्तरावरील संबंधांवर बोलणं माझ्या अधिकाराबाहेरचं आहे. मात्र, बांगलादेशमधील घडामोडी पाहता आणि पश्चिम बंगालमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी त्यांच्या नातेवाईकांचे बांगलादेशमधील अनुभव सांगितल्यानंतर, बांगलादेशातून भारतात येणाऱ्या अनेकांना अटक झालेल्या घटनांनंतर, तसेच 'इस्कॉन'च्या प्रतिनिधींशी बोलल्यानंतर, मला विधानसभेत यावर बोलणं भाग पडलं आहे," असंही बॅनर्जी म्हणाल्या.

बांगलादेशमध्ये आतापर्यंत अनेक हिंदू सन्यांशांना देखील अटक करण्यात आली आहे. तिथल्या अल्पसंख्यांकांवरील अत्याचाराविरोधात शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्यांना तिथल्या सरकारने तुरुंगात डांबलं आहे.

# भिवंडी बी. एन. एन महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामिण □ नरेंद्र पाटील**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचा महापरिनिर्वाण दिन बी. एन .एन. महाविद्यालय ग्रंथालय विभागाच्या आज वतीने साजरा करण्यात आला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अशोक वाघ ग्रंथालय समितीच्या अध्यक्षा डॉक्टर सुवर्णा रावळ व ग्रंथालय समितीचे सदस्य डॉक्टर विकास उबाळे, जिओग्राफी डिपार्टमेंटचे डॉक्टर रूपवते, महाविद्यालयाचे रजिस्टार? नरेश शिरसाळे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल माधव मुंडे ग्रंथालयातील कर्मचारी व महाविद्यालयातील विद्यार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्ताविक माधव ग्रंथपाल माधव मुंडे यांनी केले

कार्यक्रमाचे आभार राजू जयस्वाल यांनी केले. टी. वाय. बी .एस. सी .या वर्गातील कुमार कृष्णा काळुंखे या विद्यार्थ्यांने महापरिनिर्वाण दिना निमित्त आदरांजली वाहताना डॉक्टर बाबासाहेबांना कवितेतून आदरांजली वाहीली " खरंच आपण आदरांजली वाहतो का 'अशी कविता गायन केले. बाबासाहेबांचे विचार आपण घेतो का? बाबासाहेबांनी सांगितलं तसं आपण वागतो का? असा कवितेचा असा आशय होता . डॉक्टर विकास उबाळे आपल्या भाषणात ग्रंथांसाठी घर बांधणारा महामानव भारतामधला एकच आहे स्वतःसाठी सगळेच घर बांधतात ग्रंथासाठी घर बांधणारा महामानव हा एकच आहे. अमेरिकेमध्ये या महामानवास ज्ञानाचा सागर असा सन्मान देऊन पुतळा उभारण्यात आला आहे. या महामानवांनी गोरगरीब समाजाच्या उन्नतीसाठी आपला आयुष्य खर्च केले. आपल्यासाठी त्यांचे जीवन चरित्र ज्ञानदिप आहे. विद्यार्थ्यांनी जरूर वाचावे वाचनाने माणूस समृद्ध होतो त्यांना समजून घेण्यासाठी त्यांची ग्रंथसंपदा आहे आपल्याला त्यांनी दिलेली देणगी आहे असे सांगितले .

डॉक्टर रूपवते यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना बाबासाहेबांनी कोकणपट्ट्यामध्ये स्वतः जाऊन गोरगरिबांच्या जमिनी सोडवल्या चवदार तळयाचे पाणी सर्वांसाठी पिण्यासाठी खुले केले बाबासाहेबांना कुठल्याही पदाचा मोह नव्हता, ज्ञानाचा गर्व नव्हता, तर गोरगरिबांची कळवळ होती. या तळमळीनेच त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला . कितीही त्रास झाला तरी चालेल पण इतरांचे जीवन सुखी झालं पाहिजे या ध्येयाने ते जगले. बाबासाहेबांना समजून घेण्यासाठी त्यांची ग्रंथ संपदा हीच आपल्याला आधार आहे. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त त्यांची ग्रंथसंपदा वाचावी व बाबासाहेब समजून घ्यावे असे विचार मांडून आज महापरी निर्वाण दिन साजरा केला.

# सिटी कल्याण निसर्गमेळाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

कल्याण : पर्यावरण दक्षता मंडळ, कल्याण, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटि आणि नॅशनल उर्दू हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने 'सिटी कल्याण निसर्गमेळा २०२४' चे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये विविध शाळेतील ७ वी आणि ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ८ वेगवेगळया प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमागचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण शिक्षण देणे व त्याच बरोबर जनजागृती घडवणे हा होता. ३ डिसेंबर भोपाळ वायु दुर्घटना या दिवसाची स्मृति प्रीत्यर्थ या उपक्रमात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड यांच्या सहकार्याने हवा प्रदूषण तपासणीची मोबाइल व्हॅन उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली. तसेच जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी मातीपासून विविध आकाराचे भांडे बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या निसर्गमेळयामध्ये झाडे ओळखा स्पर्धा, निसर्ग छायाचित्रण स्पर्धा, भित्तिचित्र स्पर्धा, इंधन विरहित पाककृती, कापडी पिशवीवर चित्र काढणे, टाकाऊ पासून टिकवू, पर्यावरण गीत आणि पथनाट्य अशा एकूण ८ स्पर्धांचा समावेश होता. सर्व स्पर्धांसाठी तज्ञ व मान्यवर परिक्षकांचे सहकार्य लाभले. कल्याण डोंबिवली परिसरातील १४ तज्ञ मंडळींनी या कार्यात मोलाचे सहकार्य केले. रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटी तर्फे सर्व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कृत करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. पर्यावरण दक्षता मंडळातर्फे पर्यावरण प्रदर्शनी आणि पक्षी छायाचित्रांचे प्रदर्शन सादर करण्यात आली.

सुभेदार वाडा शाळा, शारदा मंदिर शाळा, शिशुविकास बेतूरकर पाडा, आंबेडकर रोड, श्री गजानन विद्यालय प्राथमिक आणि माध्यमिक, के. सी. गांधी शाळा, बालक मंदिर इंग्लिश, श्री वाणी विद्याशाळा, गायत्री माध्यमिक शाळा, नूतन ज्ञान मंदिर, आश्रय फौंडेशन काळसेकर हायस्कूल, ओल्ड बॉइज असो. इंग्लिश शाळा, मोहमदीया शाळा, नरेंद्र कान्वेंट स्कूल, स. ब. दिव्य शाळा, अभिनव विद्यालय, नॅशनल उर्दू हायस्कूल इतर एकूण २० शाळांमधून एकूण ३५० विद्यार्थी सहभागी झाले होते. पर्यावरण दक्षता मंडळातर्फे समीक्षा चव्हाण, हेमांगी सामंत, आदित्य कदम आणि रूपाली शाईवाले यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

# सुधागड एज्युकेशन सोसायटी संचलित प्राथमिक विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक दत्तात्रय पगार सेवानिवृत्त

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या मराठी प्राथमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षक दत्तात्रय हरी पगार हे आपल्या ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवापुर्ती सोहळा विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.



यावेळी हितचिंतक ,आप्तेष्ट ,नातेवाईक, विद्यार्थी, सहकारी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वतीने शाल ,श्रीफळ ,स्मृतीचिन्ह ,सन्मानपत्र देऊन त्यांना सेवापूर्ती समारंभ निमित्त निरोप देण्यात आला मराठी प्राथमिक विद्यालय कळंबोली येथे ३३ वर्षापासून सहाय्यक शिक्षक पदावर कार्यरत असणारे दत्तात्रय हरी पगार हे सेवानिवृत्त झाले. बजावलेल्या सेवे करीता त्यांच्या सेवापूर्ती समारंभ विद्यालयात आयोजित करण्यात आला होता .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी आज भूषविले. यावेळी मुख्याध्यापिका वनिता लक्ष्मण कोळी ,माजी मुख्याध्यापिका हेमलता पाटील ,सुषमा गोखले ,दत्तात्रय पगार यांच्या पत्नी मनीषा पगार ,उपमुख्याध्यापक सुरेश शिंदे, तसेच पगार यांचे भाऊ-बहीण नातेवाईक मित्र परिवार वर्गशिक्षक, वर्गमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त अनेक मित्र वर्ग, सहकारी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करून दत्तात्रेय पगार यांचे जीवनातील चढ उताराचा आलेख मांडला. त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्य हे विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरित असे असल्याचे यावेळी मुख्याध्यापिका वनिता कोळी यांनी संबोधले. कार्यक्रमानिमित्त पगार यांना शाल श्रीफळ, स्मृतीचिन्ह व शिवराज्याभिषेकाची तसबीर विद्यालय कडून सप्रेम भेट देण्यात आली. कार्यक्रमा निमित्त मनोगत व्यक्त करताना दत्तात्रेय पगार यांनी सांगितले की सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या मराठी प्राथमिक विभागात काम करण्याची संधी शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांनी मला दिल्याने माझ्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सोने झाले .माझे सर्व शिक्षक परिवार हे माझ्याबरोबर काम करीत असताना जीवाभावाचे ऋणानुबंध जपून वागणूक दिल्यामुळे मी भारावून गेलो आहे .माझ्या सर्व सहकारी मित्र वर्गाचे माझ्याविषयी असलेले प्रेम कधीच विसरू शकणार नाही. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी वरुणकर यांनी केले.

# भाजपाचे संजय मोरे यांच्यावतीने दिव्यांगांना मायेची ऊब

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या अद्वितीय यशाबद्दल भाजप कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे यांच्या नियोजनाखाली भाजप दिव्यांग सेल तसेच स्वराज्य अपंग संस्था यांच्यातर्फे ३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या जागतिक दिव्यांग दिनाच्या अनुषंगाने विभागातील दिव्यागांना मायेची ऊब म्हणून ब्लँकेट तथा भेट वस्तू वाटप करण्यात आल्या. संजय मोरे यांच्या जनसंपर्क



कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला कल्याण पूर्वच्या नवनिर्वाचित आमदार सुलभा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत दिव्यांगाना भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार सुलभा गायकवाड यांच्यासह भाजपा कल्याण पूर्व मंडल अध्यक्ष संजय मोरे, महिला मोर्चा अध्यक्षा सविता देशमुख, दिव्यांग सेल जिल्हा सहसंयोजक मंगेश पवार, दिव्यांग सेल कल्याण पूर्व अध्यक्ष मोहन हुले, कल्याण जिल्हा संयोजक दिव्यांग सेल सुनीता गुंजाळकर, दिव्यांग सेल सल्लागार कमल हिंगोले, संतोष मोरे, सचिन कुरणे, विनोद गायकवाड, रुपेश साळुंके आदींसह बहुसंख्य दिव्यांग उपास्थित होते.

## दैनिक राशिफल

सोमवार ०९ डिसेंबर २०२४

**मेष**
आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्हाला अभिमान वाटेल. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल.आज काही सामाजिक कार्यक्रमात जाण्याची संधी

**वृषभ**
तुमच्या मुलाकडून तुम्हाला आनंद मिळेल. आरोग्य चांगले राहील. दिवस खूप छान असणार आहे. भावा-बहिणींसोबत खूप मजा कराल

**मिथुन**
मसालेयुक्त पदार्थ टाळल्यास आरोग्य चांगले राहील. जोडीदारासोबतचे गैरसमज दूर होतील.आर्थिक स्थिती मजबूत होईल आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.

**कर्क**
एखाद्या गरजूला कपडे द्या, जीवनात आनंद येईल. आज तुमचे आर्थिक प्रश्न सुटतील, मित्र तुम्हाला मदत करेल. संध्याकाळी तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल.

**सिंह**
आजूबाजूच्या लोकांशी सौहार्द ठेवा. प्राध्यापकांसाठी दिवस लाभदायक पुढे जाण्याची संधी मिळेल. मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करू शकतात.

**कन्या**
आज थोडा विचार करून व्यवसायात पुढे जाणे योग्य राहील. ठरवलेल्या कामात तुम्हाला नक्कीच यश मिळेल. या राशीच्या लोकांनी गरजेपेक्षा जास्त कोणावरही विश्वास ठेवू नये.

**तुळ**
व्यवसायासाठी आज केलेले प्रयत्न भविष्यात फळ देतील. आरोग्याच्या दृष्टीनेही सर्व काही चांगले राहील.विद्यार्थ्यांना आज चांगली बातमी मिळेल. दिवस चांगला जाणार आहे.

**वृश्चिक**
वैवाहिक जीवन आज उत्तम राहील. आज तुमचा दिवस सामान्य जाईल. ऑफिसमध्ये आज तुमच्या काही कामांची प्रशंसा होईल.

**धनु**
आज तुमचे आरोग्य चांगले राहील. आजचा दिवस तुमच्यासाठी आनंददायी असेल, ज्यामुळे तुम्ही दिवसभर उत्साही राहाल हार्डवेअर व्यावसायिकांसाठी दिवस लाभदायक ठरेल.

**मकर**
वैवाहिक नात्यात सुरू असलेल्या कलहातून तुम्हाला आराम मिळेल. आज तुमच्या नात्यात गोडवा येईल. बांधकाम व्यावसायिकांची सुरू असलेली कामे आज पूर्ण होतील.

**कुंभ**
स्पर्धेच्या तयारीत यश मिळेल. सराव सुरू ठेवा. या राशीच्या महिलांसाठी चांगल्या संधी निर्माण होतील ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे.

**मीन**
प्रियकराकडून सरप्राईज मिळेल, तुमच्या नात्यात गोडवा वाढेल. विद्यार्थी वर्गमित्रांच्या मदतीने पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण करतील, नोकरीच्या ठिकाणी पुढे जाण्याच्या योजना यशस्वी होतील.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558




## सौ.कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

सौ.कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा येथे शै.वर्ष २०२२-२३ मधील पदवीधर विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान समारंभ उत्साहात साजरा झाला.

पदवीप्रदान समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री.अनंत कुलकर्णी साहेब ( व्यवस्थापकीय संचालक - कल्याण जनता सहकारी बँक ) मा.श्री. विजय जोशी साहेब ( उपाध्यक्ष - चेंबर ऑफ स्मॉल इंडस्ट्री असोसिएशन ) तसेच मा.श्री.रविंद्रजी घोडविंदे सर ( अध्यक्ष - जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई ) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा. योगेश माळी सर, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सदर पदवीप्रदान समारंभ उत्साहात पार पडला. सन्माननीय पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करून सर्वांना पदवी प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

## ऑनलाईन सभेतून साहित्यिकांकडून बांगलादेश सरकारचा तीव्र निषेध!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर ग्रामिण □ नरेंद्र पाटील

अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या वतीने कोकण प्रांतातील सर्व साहित्यिकांची ऑनलाईन सभा शनिवार दि. ७ डिसेंबर,२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती.

संस्कृत भारतीचे निरज दांडेकर यांनी संघटन मंत्री म्हणून या सभेची सुरवात केली. त्यानंतर प्रास्ताविक करतांना साहित्य भारतीचे कोकण प्रांत अध्यक्ष मा. दुर्गेश सोनार यांनी बांगलादेशातील दलित, बौद्ध, हिंदू यांच्या मानवाधिकाराचे होत असलेले उल्लंघन, अन्याय, अत्याचार याची पार्श्वभूमी सांगून निषेध सभेचे प्रयोजन सांगितले. त्यानंतर सभेत बोलतांना समरसता साहित्य परिषदेचे मा. नागेश धोंडगे यांनी १९४७ साली मुस्लिम लीग सोबत युती करून बांगलादेशात राहिलेल्या नमोशुद्रा या दलित समाजातील बांधवांना आज तेथे मुस्लिम कट्टरपंथीयांनी कसे जीणे नको करुन सोडले आहे, त्यांना नाहक मारले जात आहे, त्यांची घरे जाळली जात आहेत याची माहिती देवून या गोष्टीचा तीव्र निषेध केला. कोकण मराठी साहित्य परिषदेचे मा. एल.बी.पाटील यांनी बांगलादेशातील सरकार आपले संवैधानिक काम करीत नाहीत, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या पुतळयाची विटंबना होते, अल्पसंख्यांकांवर अत्याचार होतात यावर तीव्र संताप व्यक्त केला. तर प्रीतम शर्मा यांनी मुस्लिम धर्मियांची विचारसरणी हिंसेला कशी कारणीभूत आहे याची उदाहरणे देवून भारततही अनेक भाग मुस्लिम बहुल होत चालले आहेत याची चिंता व्यक्त केली. बांगलादेशी मुसलमानही भारतात घुसले आहेत या धोक्यासंबंधात आपण कायम सतर्क राहिले पाहिजे, असे आवाहन केले. काव्य किरण मंडळाच्या वतीने स्वाती नातू, लोकमंगल संस्थेच्या वतीने ?ड. स्वप्नील चौधरी, स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रसिद्ध साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर, नवी मुंबई साहित्य परिषदेच्या ॠतुजा गवस, दीनदयाळ विचार मंचाचे प्रा. नारायण फडके, या सर्वांनी बांगलादेशात झालेली देवळांची जाळपोळ, हिंदुच्या दुकानांची लूट, इस्कॉनचे महंत दास यांची अटक या गोष्टींबद्दल बांगलादेशाची निर्भत्सना केली. भारतातील तरुण पिढीला या विषयी सजग करण्याचे आवाहन केले. साहित्य भारतीचे प्रदेश मंत्री पृथ्वीराज तौर, निकिता भागवत, प्रा. अरूण ठोके, गीतेश शिंदे यांनी गाझा युद्धा विषयी बोलणारे बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध काहीच बोलायला तयार नाहीत, त्यांचा दुटप्पीपणा जगासमोर आणायला हवा, भारतातही आपण सावध झाले पाहिजे, साहित्यिकांनी कृतिशील झाले पाहिजे, आपल्या मुलांना परिस्थितीची जाणीव करुन देवून त्यांना आपल्या संस्कृती विषयाचा अभिमान उत्पन्न होईल असे संस्कार द्यायला हवेत असे प्रतिपादन केले.

विजय फडके यांच्या हिंदूत्वावरील ओजस्वी गीतानंतर साहित्य भारतीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष व साहित्य अकादमी दिल्लीचे सदस्य प्रा. नरेंद्र पाठक यांनी सभेचा समारोप केला. ते म्हणाले जग नीट चालण्यासाठी साहित्यिकांची जबाबदारी फार मोठी आहे. बांगलादेशातील घटना मन विषण्ण करणाऱ्या आहेत. त्याविरुद्ध आपणा सर्वांनी आवाज उठवला पाहीजे. भारताने नेहमी विश्वकल्याण पाहीले आहे. भारताने नेहमीच शेजाऱ्यांना मदत केली आहे. कोविडची लस अनेक गरीब राष्ट्रांना मोफत देवून भारताने तेथील नागरिकांचे प्राण वाचविले आहेत. ही येथील सनातन धर्मांची शिकवण आहे. बांगलादेश स्वतंत्र करण्यात भारताचीच प्रमुख भूमिका होती असे असतांना बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, दलित यांच्यावर अत्याचार होतात, घरे, दुकाने फोडली जातात, ज्या इस्कॉनने कठीण काळात बांगला देशातील जनतेला जेवू घातले, ७५००० करोड रुपयांची मदत केली. तरी त्यांचीच देवळे जाळली जातात ही कृतघ्नता आहे. साहित्यिकांनी यावर व्यक्त होवून जगासमोर हा अन्याय अत्याचार मांडला पाहिजे असे आवाहन केले.

साहित्यिकांनी साहित्यामधून निषेध करणे तर अपेक्षित आहेच परंतु आपापल्या ठिकाणी विविध मार्गांनी आणि पद्धतीने बांगलादेशींच्या अशा कृत्याचा निषेध करणे आवश्यक आहे, असे सर्वानुमते ठरले आणि आपापल्या स्तरावर जमेल त्या वेगवेगळ्या पद्धतीने यासाठी साहित्यिकांनी सज्ज रहावे अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. या साहित्यिकांच्या निषेध सभेसाठी विविध ठिकाणांहून साहित्यिकांनी हजेरी लावली होती. सभेचे सूत्रसंचालन साहित्य भारती कोकण प्रांत कार्याध्यक्ष प्रवीण देशमुख यांनी केले होते.

## बांगलादेशातील हिंदूंवरील अन्यायाविरोधात मुरबाडमध्ये मुकमोर्चा व मानवी साखळीचे आयोजन!




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ दिलीप पवार

**मुरबाड :** रविवार दिनांक ०८ डिसेंबर २०२४ रोजी, तीन हात नाका मुरबाड ते श्रीराम मंदिर, मुरबाड येथे आज सकल हिंदू समाजाच्या वतीने शांततामय मार्गाने मुकमोर्चा काढण्यात आला.

बांगलादेशातील हिंदू, बौद्ध आणि अन्य अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चात शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मोर्चाचा उद्देश बांगलादेशातील हिंदूंवर होणारे धार्मिक अत्याचार थांबवण्यासाठी जागतिक पातळीवर दखल घेतली जावी आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने ठोस उपाययोजना कराव्यात, असा होता. इस्कॉन साधूंच्या तातडीने मुक्ततेची मागणीही करण्यात आली.

विशेषतः बांगलादेशातील जिहादी कट्टरपंथीयांकडून मंदिरे, घरे उद्ध्वस्त करणे, तसेच मानवी हक्कांचे उल्लंघन यावर तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी मानवी साखळी तयार करत शांततेत बांगलादेश सरकार व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे आपला आवाज पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

मुरबाड बस स्थानका जवळील असलेल्या भारतीय ध्वजस्तंभ येथे राष्ट्रगीत गायन करून मोर्चाची सुरवात करण्यात आली. व शेवटी श्रीराम मंदिर येथे पसायदानाने सांगता करण्यात आली.येत्या मंगळवारी तहसीलदार मुरबाड यांना निवेदन देऊन या मागण्यांची पूर्तता करण्याची विनंती करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजनांची मागणी या निवेदनात करण्यात येणार आहे.

## पारनेर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक व्हावे - अखिल मातंग समाज चळवळ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ श्री दिपक वरखडे

**पारनेर :** पारनेर येथे रविवार दिनांक १/१२/२०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, पारनेर या ठिकाणी अखिल मातंग समाज चळवळ पारनेर, यांची बैठक संपन्न झाली. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊसाठे यांचे स्मारक पारनेर तालुक्याच्या ठिकाणी व्हावे. अशी सर्व समाज बांधवानी इच्छा



व्यक्त केली. सौ. राणीताई उमाप यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये शुक्रवार दि.६-१२-२०२४ रोजी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांना निवेदन देऊ असा सर्व समाज बांधवांचा एक मताने ठराव झाला. सदर निवेदनात समाज बांधवांची पारनेर या ठिकाणी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक उभारण्याचा मानस आहे.यासाठी समाज बांधवांनी आपल्या पातळीवर अनेक प्रयत्न केले परंतु जागेचा अभाव व समाजाचे आर्थिक परिस्थिती पाहता ते शक्य झाले नाही. म्हणून मातंग समाज बांधवांनी एक विचाराने बैठक घेऊन आपणास शासकीय जागा उपलब्ध करून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक व्हावे अशी विनंती करण्यात आली. सदर स्मारक उभारणीनंतर त्यामध्ये समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण वर्ग होणार आहे. वाचनालय,आरोग्य शिबीर,शिक्षण विषयक अभ्यास केंद्र,एमपीएससी, यूपीएससी,विद्यार्थ्यांचे विशेष अभ्यास केंद्र होणार असून या माध्यमातून स्मारक उभारण्याचा विचार तालुक्यातील समाज बांधवांचा आहे.म्हणून जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आपणास पारनेर तालुक्यातील अखिल मातंग समाज चळवळ यांच्यावतीने आपणास विनंती करण्यात येत आहे असे निवेदन देण्यात आले.

## खरोशी येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर



दै. ठाणे जीवनदिप वार्ता
**पेण (प्रतिनिधी)**

पेण तालुक्यातील खरोशी येथे डॉ. सुहास हळदीपुरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल पनवेल आणि ग्रामपंचाययत खरोशी व ग्रामस्थ मंडळ खरोशी यांच्या संयुक्त विद्यमाने आज ८डिसेंबर मोफत डोळे तपासणी व मोफत ऑपरेशन शिबिर राबविण्यात आला त्यामध्ये ७० लोकांनी शिबिराचा लाभ घेतला तसेच १८ लोकांना मोतीबिंदू असल्याचे मशिन्द्वारे निदर्शनास आले त्यामधून १३ लोकांना आज लगेच पनवेल हळदीपूरकर हॉस्पिटल पनवेल येथे ऑपरेशन साठी नेण्यात आले आहे. या शिबिरासाठी डॉ. मृण्मयी वैद्य, प्रशांत गायकवाड,पायल पाटील, भूषण रंगारी, जयप्रकाश यादव, सरपंच सौ. रूपाली पाटील महेश पाटील तसेच विशेष सहकार्य हसुराम कृष्णा पाटील,प्रणय हरिभाऊ पाटील, मंजुळा माळी, जितेश पाटील आदि ग्रामस्थांनी सहकार्य केले.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वसई तालुक्याची आढावा सभा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर / पंचायत समिती वसई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर, रवींद्र शिंदे, यांनी गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत), विस्तार अधिकारी (सांख्यिकी), सर्व विभागप्रमुख, उपअभियंता, शाखा अभियंता, सहाय्यक प्रशासन अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक यांची समन्वय आढावा सभा घेतली.

यावेळी उपमुख्यकार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत,चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता विभाग अतुल पारसकर, प्रदिप डोलारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती वसई तसेच अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचा आढावा घेताना सन २०१६-१७ ते २०२३-२४ पर्यंतची प्रधानमंत्री आवास योजना, व राज्यपुरस्कृत घरकुल योजनांची अपूर्ण घरकुले माहे जानेवारी २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याबाबत सुचना दिल्या. लाभार्थी घरकुले बांधून पूर्ण करत नसतील तर सदर घरकुलांना




वाटप केलेले अनुदान शासन खाती भरणा करुन सदरची घरकुले रद्द करणत यावी. तसेच सन २०२४-२५ वर्षातील सर्व योजनांची घरकुले माहे मार्च २०२५ अखेर पर्यंत पूर्ण करण्याची कार्यवाही करावी.अशा सूचना रवींद्र शिंदे यांनी दिल्या.

शासकीय जमीनीवरील घरकुलांबाबत शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करुन प्रलंबित घरकुले पूर्ण करणेत यावीत,असेही यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले.

माझी वसुंधरा अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना केल्या.

ग्रामपंचायत विभागामधील जनसुविधा व नागरी सुविधा योजनेंतर्गत सन २०२३-२४ वर्षातील अपूर्ण कामे १५ जानेवारी २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात यावीत,तसेच मंजूर कामे माहे मार्च २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्यांत यावीत, २०२५-२६ चे आराखडे सादर करताना शासन निर्णयाप्रमाणे कामे घेण्यांत यावीत तसेच ग्रामपंचायतीकडील शिल्लक रक्कमे इतकीच कामे प्रस्तावित करण्याची दक्षता घेण्यात यावी.शासन निर्णयाप्रमाणे ग्रामसभा घेण्याची दक्षता घेणेत यावी,१५ वा वित्त आयोगांतर्गत बंधित व अबंधित सन २०२०-२१ ते २०२३-२४ पर्यंतची सर्व कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करावी.

१५ वा वित्त आयोगांतर्गत कामांवरील शासकीय वजातींचा भरणा संबंधित खात्यांवर करण्याची दक्षता घेणे, ग्रामपंचायतीमधील सर्व घरपट्टी धारकांना घरपट्टी आकरणी देयकांची बजावणी सोमवार दिनांक ०९.१२.२०२४ पर्यंत पूर्ण करुन तसा अहवाल जिल्हा कार्यालयास सादर करावा,ग्रामपंचायतीकडील कर वसुली १००इ पूर्ण करण्याची कार्यवाही अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

सर्व ग्रामपंचायतींनी शासनाने नेमलेल्या निविदाकाराकडून कचराकुंड्या, ई-व्हेईकल खरेदी करणेबाबत कार्यवाही करणे,वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये पूर्ण करणे,

सार्वजनिक शौचालयांतर्गत नवीन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश पाणी व स्वच्छता विभागाचा आढावा घेते वेळी देण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी यावेळी सर्व योजनांची कामे मार्च २०२५ अखेर पूर्ण करुन १००इ खर्च नोंदविणेबाबत सूचना दिल्या. सर्व विभागांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

या बैठकीस हनुमंत कांबळे, उपविभागीय अभियंता (बांधकाम) पंचायत समिती वसई,गटशिक्षण अधिकारी,विस्तार अधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय पुरस्काराने स्पार्क मिंडा सन्मानित!




दै.ठाणे जीवनदीप वार्ता
बाळासाहेब भालेराव

**मुरबाड दि.८** मुरबाड स्पार्क मिंडासह भारत देशात व सहा देश बाहेर असे मिळून जवळपास ३४ प्लॉटमध्ये स्पार्क मिंडाचे काम चालू आहे तसेच या ठिकाणी १७००० कर्मचारी काम करत आहे. या कामाची दखल घेऊन त्यांना

३ डिसेंबर २०२४रोजी स्पार्क मिंडा (मिंडा कॉर्पोरेशन लि.) च्या 'सक्षम ' कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमाला भारताचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू याच्या हस्ते प्रदान करण्यात आला असून हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार मिळणे हे एक मोठे यश आहे. हा पुरस्कार 'दिव्यांगजनों के लिए सर्वोत्तम नियोक्ता' या श्रेणीत स्पार्क मिंडा च्या अद्वितीय कार्यासाठी दिला गेला.

'सक्षम' कार्यक्रमाने देशभरातील २१,००० पेक्षा जास्त दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अंग, सहाय्यक उपकरणे आणि युडीआयडी (युनिक डिसॅबिलिटी आयडी) नोंदणी सेवा पुरवली आहे. तसेच, स्पार्क मिंडा गट कंपन्यांमध्ये १,००० हून अधिक दिव्यांग व्यक्तींना रोजगार देत आहे.

स्पार्क मिंडा फाउंडेशनच्या अध्यक्षा सरिका मिंडा म्हणाल्या, 'आम्हाला अत्यंत अभिमान आहे की 'सक्षम' कार्यक्रमाला हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार सर्व स्पार्क मिंडा कुटुंबातील सर्व सदस्यांना समर्पित आहे, ज्यांनी दिव्यांग व्यक्तींना समान संधी देण्याच्या आमच्या ध्येयात योगदान दिले.'

हा पुरस्कार संपूर्ण स्पार्क मिंडा कुटुंबासाठी एक मोठा सन्मान आहे, जो कंपनीच्या समाजातील समावेशकता आणि जबाबदारीच्या मूल्यांचे प्रतीक आहे.

## आयआर क्लास सिस्टम्स अँड सोल्युशन्सच्या व्यवस्थापकीय संचालकपदी विनय क्षीरसागर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

श्री विनय क्षीरसागर यांची ०१ डिसेंबर २०२४ पासून आयआरक्लास सिस्टम्स अँड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड व्यवस्थापकीय संचालक - (मॅनेजिंग डायरेक्टर) पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सागरी उद्योग आणि चाचणी, तपासणी आणि प्रमाणता सेवा उद्योगांमध्ये त्यांना पस्तीस वर्षांपेक्षा जास्त समृद्ध अनुभव आहे, त्याद्वारे श्री विनय क्षीरसागर व्यवसायात वाढ, नाविन्य आणि ऑपरेशनल कार्यक्षमतेमध्ये निपुणता आणणे साध्य करतील.

ते आयआरक्लास सिस्टम्सला



चाचणी, तपासणी, शाश्वतता आणि डिजिटल सोल्यूशन्स यासह अनेक क्षेत्रांमध्ये व्यवसाय वाढवण्याच्या दिशेने मार्गदर्शन करतील. आयआरक्लास सिस्टम्स अँड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडबद्दल

आयआरक्लास सिस्टम्स अँड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी सर्वसमावेशक चाचणी, तपासणी आणि प्रमाणता सेवा प्रदान करते, ज्यायोगे उद्योगांना त्यांच्या सर्व मूल्यशृंखलांमध्ये गुणवत्ता, सुरक्षितता आणि शाश्वतता वाढवण्यासाठी सक्षम करते.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि उत्कृष्टतेची वचनबद्धता, याद्वारे आयआरक्लास सिस्टम्स विविध क्षेत्रांमध्ये अनुरूप सेवा प्रदान करते, त्यामुळे जागतिक दर्जाच्या मानकांचे पालन सुनिश्चित करता येते आणि नवकल्पनांना चालना मिळते.

## रेल्वेत नोकरीच्या आमिषाने ७४ लाखांची फसवणूक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रेल्वेमध्ये नोकरीला लावतो, असे सांगून येथील एका कुटुंबातील सदस्य, संशयास्पद रेल्वे अधिकाऱ्यांनी संगनमत करून रायगड जिल्ह्यातील रोहा येथील एक रहिवासी आणि इतर बेरोजगार तरूणांची एकूण सुमारे ७४ लाख ४० हजार रूपयांची फसवणूक केल्याची तक्रार महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रारदाराकडून दाखल करण्यात आली आहे. फसवणूक झालेल्या रोहा येथील एका व्यक्तिने याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुरुवारी तक्रार केली. पोलिसांनी प्राथमिक तपासणी अहवाल नोंदवून घेतला आहे.

### जाहिर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय, मुरबाड**

**प्रति,**
**१) श्री. तुकाराम जानू बांगारा,**
**राहणार रा. पांटगाव, ता. मुरबाड,**
**जि. ठाणे ........................................ अर्जदार**

**विरुद्ध**

**२) ग्रामपंचायत पाटगाव,**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे ......................... सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

१. उपरोक्त अर्जदार यांचे आई कै. मुक्ता जानू बांगारा यांचा मृत्यु दिनांक ०७/०६/२००७ रोजी राहत्या घरी मु. पाटगाव, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी जन्म/ मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ४१३ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या आईचा जन्म/ मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करिता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ०२/०९/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**हुकमावरुन**
**सही/-**

शिक्का

**(श्रीम. सुषमा आव्हाड- बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**

***जा.क्र. फौजदारी/जन्म मृत्यु नोंद / कावि- १३७/२०२४**

# निवडणुकीत सहकार्य करणाऱ्यांचा खडकपाडा पोलिसांकडून सन्मान




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये बंदोबस्त कामी मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने हि उणीव लक्षात घेऊन परिमंडल ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी परिमंडळ तीन मधील सर्व पोलीस स्टेशनला कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी यांची विशेष पोलीस अधिकारी म्हणून मदत घेण्याबाबत सुचविले होते.

त्याप्रमाणे खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ अमरनाथ वाघमोडे यांनी के. एम. अग्रवाल कॉलेज गांधारी व एल. डी. सोनवणे कॉलेज वाडेघर कल्याण यांच्याशी संपर्क साधून त्यांना निवडणूक बंदोबस कामी एनसीसी, एनएसएस विद्यार्थी मदतीस देण्यासाठी आवाहन केले. त्याप्रमाणे अग्रवाल कॉलेजचे एनसीसी २५ विद्यार्थी व सोनवणे कॉलेजचे एनएसएसचे २५ विद्यार्थी उपलब्ध झाले होते. या विद्यार्थ्यांनी मतदान केंद्रावर पोलिसांच्या सूचनेप्रमाणे नागरिकांच्या रांगा लावणे, ज्येष्ठ नागरिकांना मदत करणे असे महत्त्वाची कामे केल्याने पोलीस विभागांना त्यांची फार मोठी मदत झाली. याची जाणीव ठेवून पोलीस उपयुक्त परिमंडळ ३ कल्याण यांनी अशा सर्व विशेष पोलीस अधिकारी यांचा व निवडणूक काळात मदत करणारे इतर पोलीस मित्र यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्याचे आदेश दिले होते.

खडकपाडा पोलीस स्टेशन येथे या सर्व एनसीसीचे व एनएसएसचे विद्यार्थी आणि पोलीस मित्र यांचा विशेश पोलीस अधिकारी म्हणून त्याचप्रमाणे निवडणूक काळामध्ये बाहेर गावाहून बंदोबस्त करिता आलेले पोलीस, होमगार्ड यांची राहण्याची व्यवस्था करणारे ब्रायटन वर्ल्ड स्कूलचे संचालक पंकज वीर, वाहने पुरविणारे दुर्गा टूर्स ट्रॅव्हल्सचे विश्वंभर डोमाडे, जेवण पुरविणारे लक्ष्मी केटरर्सचे संध्या सोनार, ड्रोन ऑपरेटर अद्वैत ढाकणे, सर्व पोलिस वाहनावर पी ए सिस्टीम पुरविणारे प्रमोद गावडे बंदोबस्ताचे लोकांकरिता कार्पेट व इतर व्यवस्था पुरविणारे अरुण चव्हाण यांचा देखील विशेष सन्मान यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे डॉ अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक संदीप शिवले, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबिका घस्ते यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि गुलाब पुष्प देऊन करण्यात आला. पोलिसांनी आपल्या कामाची घेतलेली दखल व केलेला सन्मान यामुळे सर्व विद्यार्थी व पोलीस मित्र आनंदी झाले असल्याचे दिसून आले. यावेळी विद्यार्थ्यांनी व पोलीस मित्र यांनी पोलीस बंदोबस्त दरम्यान आपल्याला आलेले अनुभव कथन केले. पोलिसांबरोबर काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल तसेच केलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले.

# आज भ्रष्टाचार विरोधी दिन

**आज कोणत्याही सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. दररोजचे वर्तमान पत्र उघडले की एक तरी लाचखोरीची बातमी वाचायला मिळतेच. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन लाचखोर त्यांनाच जाळ्यात अडकवत आहे. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांश जनतेला आला आहे. राजस्थानमधील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते.**

आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड होत आहेत. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर आज भ्रष्टाचार शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वात भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण दिवसेंदिवस देशातील भ्रष्टाचार वाढत चालला आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५०अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही छोटी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाची ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.

देशाला लागलेली ही भ्रष्टाचाराची किड आता लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून हा भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला सुळावर लटकवणे तर दूरच मात्र शिक्षा झाल्याचेही ऐकवात नाही. त्यामुळेच भ्रष्टाचार वाढत चालला आहे. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एक तरी भ्रष्टाचाराची किंवा लाचखोरीची बातमी वाचायला मिळेल. एका एका भ्रष्ट अधिकाऱ्याकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा कोणताही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलीस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असेल तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास चालू आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला देखील भ्रष्टाचाराने घेरले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे सुरू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू रामदेव बाबा यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपोषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपच्या नेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरुद्ध वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टचार नष्ट होईल असे वाटले होते. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा....... ना खाणे दुंगा..... असा इशारा भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. देशातील लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल मात्र तसे काही झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विरोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे.

ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झाला नाही. आज कोणत्याही सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. दररोजचे वर्तमान पत्र उघडले की एक तरी लाचखोरीची बातमी वाचायला मिळतेच. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन लाचखोर त्यांनाच जाळ्यात अडकवत आहे. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांश जनतेला आला आहे. राजस्थानमधील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचे हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्ट्राचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जाते होते. आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.




## मंत्रीमंडळातून डच्चू?...

पान १ वरून ▶▶ एकनाथ शिंदे जो निर्णय देतील तो मान्य असेल असं वक्तव्य केलं आहे. मला माझ्या मतदारसंघातील जनतेने पाचव्यांदा निवडून पाठवले आहे. मी माझ्या मतदारसंघाला न्याय देण्याचा प्रयत्न करेन, त्यांची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन त्यांनी मला वेगवेगळ्या पदावर काम करण्याची संधी दिली आहे, म्हणून चांगलं काम करण्याचा प्रयत्न केला आहे. यावरती बोलताना संजय राठोड म्हणाले, मला वेगवेगळ्या पदावर काम करण्याची संधी वरिष्ठांनी दिली. मी महसूल राज्यमंत्री म्हणून देखील काम केलेला आहे. वनखात्याचा कारभार देखील मी सांभाळलेला आहे. अन्न औषध प्रशासनाचा काम देखील मी पाहिलेला आहे. जलसंधारण विभाग देखील मी पाहिलेला आहे आणि या सर्व खात्यांच्या माध्यमातून जनतेसाठी आपण काय चांगले निर्णय घेऊ शकतो. काय चांगले धोरण आखू शकतो हाच प्रयत्न केला आहे. आता परत मला जर संधी मिळाली तर मला जे काही खाते मिळेल त्या खात्याला मी न्याय देण्याचा प्रयत्न करेल आणि चांगलं काम करेल असं संजय राठोड म्हणालेत.

## महापालिकांना वाढीव पाणी...

पान १ वरून ▶▶
वाढवण्यासाठी नवीन पंप हाऊसचे बांधकाम, नवीन जलवाहिनी टाकणे आणि जुन्या जलवाहिनीची दुरुस्ती करणे या कामासाठी २७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तांत्रिक मान्यता होऊन सुमारे तीन वर्षे हा प्रकल्प कागदावरच होता. या प्रकल्पासाठी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाठपुरावा केला. दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निधीस ऑक्टोबर महिन्यात मान्यता दिल्याने प्रकल्प उभारणीचा मार्ग मोकळा झाला होता. या प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ आयुक्त राव यांच्या हस्ते नुकताच पार पडला.

स्टेम अंतर्गत येणाऱ्या महापालिका क्षेत्रातील वाढीव पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन पंप हाऊस आणि नवीन जलवाहिनी टाकरण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा अवधी देण्यात आला असला तरी हे काम दीड वर्षातच पूर्ण करावे. त्यामुळे शहरांना कोणत्याही अडथळ्याशिवाय पाणीपुरवठा करणे शक्य होईल. तसेच, भविष्यात वाढीव पाणी उपलब्ध झाल्यास तेही या यंत्रणेमार्फत पुरवणे शक्य होईल, असे आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले. नवीन पंप हाऊसमुळे पाणी उचलण्याची क्षमता वाढणार आहे. शिवाय नव्या जलवाहिनीमुळे पाण्याची गळती रोखली जाईल. सध्या नऊ पंपाद्वारे नदीपात्रातून पाण्याचा उपसा करण्यात येतो. नवीन व्यवस्थेत सहा पंपाद्वारे पाण्याचा उपसा केला जाणार असून यामुळे विजेची मोठ्या प्रमाणात बचत होईल, असा विश्वास व्यवस्थापकीय संचालक संकेत घरत यांनी व्यक्त केला.

ठाणे, भिवंडी-निजामपूर मीरा-भाईंदर या महापालिका क्षेत्रांसह जिल्हा परिषद हद्दीतील काही गावांना स्टेम कंपनीकडून सध्या ३०० दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. स्टेम प्राधिकरण उल्हास नदीतून पाणी उचलून त्याचा शहरात पुरवठा करते. पाणी उपसा करण्यासाठी उल्हास नदीपात्रात ३०० दशलक्ष लिटर क्षमतेचा पंप हाऊस आणि जलवाहीनी आहे. याचे बांधकाम १९८५ मध्ये करण्यात आले होते. आता हे पंप हाऊस जुने झाले असून जलवाहिन्याही जुन्या झाल्या आहेत. त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर होतो. त्यावर मात करण्यासाठी नवीन आणि जास्त क्षमतेचे पंप हाऊस तसेच जलवाहिन्यांचे काम हाती घेण्यात आले आहे.

## शरद पवारांनी...

पान १ वरून ▶▶ बावनकुळे यांनी केली. विधानसभेत प्रचंड मोठा पराभव त्यांचा झाला. जनतेने त्यांना नाकारलं आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पराभवाची भीती आहे. आता शरद पवार जनतेला कन्फ्युज करत आहेत. मारकडवाडीत आलेले लोक हे शरद पवारांचे कार्यकर्ते आहेत असाही आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. जनतेनी लोकसभेचा खोटारडेपणा विधानसभेला दाखवून दिला. जर इतकंच असेल तर मारकडवाडीत यापूर्वी ज्या ज्या वेळी ईव्हिएमवर मतदान झालं तेव्हा आक्षेप का घेतले नाहीत? त्यांची आकडेवारी पाहिल्यानंतर आक्षेप घ्यायला हवे होते ना? आता जाणीवपूर्वक महाराष्ट्राची दिशाभूल करुन शरद पवार आपलं अपयश झाकण्याचं काम शरद पवार करत आहेत अशी बोचरी टीका चंद्रशेखर बावनकुळेंनी केली. शरद पवार, राहुल गांधी किंवा अजून त्यांच्या मविआच्या नेत्यांनी कितीही नौटंकी केली तरी काही उपयोग होणार नाही. महाराष्ट्र यांच्या नौटंकीला कंटाळला आहे. महायुती विकास करते आहे हे जनतेला कळलं आहे त्यामुळे महाराष्ट्राने महायुतीला मतदान केलं आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राला क्रमांक एकचं राज्य करण्यासाठी आम्ही काम करणार आहोत असंही बावनकुळे यांनी म्हटलं आहे. महाविकास आघाडीला वाटत असेल की ईव्हीएममध्ये चूक आहे तर मग निवडून आलेल्या सगळ्या खासदारांनी राजीनामा दिला पाहिजे. अनेक निवडणुका झाल्या आहेत ज्यात अपयशही आलं आहे. लोकसभेत आम्हाला अपयश आलं आम्ही काही ईव्हीएमला दोष दिला नाही. ज्या चुका झाल्या त्या सुधारुन आम्ही पुढे गेलो. आता या वयात शरद पवार यांनी किती खोटेपणा करायचा? असा प्रश्न चंद्रशेखर बावनकुळेंनी विचारला आहे.

## समाजवादीवर टीकास्त्र...

पान १ वरून ▶▶ महाराष्ट्रातले त्यांचे काही नेते भाजपला मदत करतात. त्यांची बी टीम म्हणून काम करतात. या निवडणुकांमध्ये त्यांनी कुणाला कशी मदत केली, यावर मला फार बोलायचं नाही.'

शिवसेना ठाकरे गटाच्या हिंदुत्वाबद्दलच्या भूमिकेबाबत आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, 'बाबरी मशिदीबद्दल काल जे ट्वीट करण्यात आलं, ते आम्ही या आधीही केलं आहे. कायम करत आलो आलो आहोत. आम्ही कधीही हिंदुत्व सोडलं नाही. आम्ही नेहमी हिंदुत्वासोबत आहोत. आम्ही कधीही म्हटलं नाही की आम्ही हिंदुत्ववादी नाहीत. आमचं हिंदुत्व स्पष्ट आहे. हृदयात राम आणि हाताला काम हे आमचं हिंदुत्व आहे. आमचं हिंदुत्व सगळ्यांना सोबत घेऊन चालणारं आहे. भाजपनं सबका साथ सबका विकास ही घोषणा दिली होती, मात्र प्रत्यक्षात आम्ही सबका साथ सबका विकास करत आहोत.'

## विधानसभा अध्यक्षपदी...

पान १ वरून ▶▶ विधानसभेतील रणनीतीसाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची सकाळी बैठक पार पडली. त्यात विधानसभा अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरायचा की नाही यावर चर्चा झाली. त्यात मविआकडून कुणीही उमेदवारी अर्ज भरायचा नाही असं ठरलं. त्यात महायुतीकडून राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे राहुल नार्वेकरांची बिनविरोध निवडीचा घोषणा उद्या अधिवेशनात होईल. मात्र विरोधी पक्षाकडून सत्ताधाऱ्यांना २ प्रस्ताव देण्यात आले आहेत त्यात विधानसभेचे उपाध्यक्षपद आणि विरोधी पक्षनेतेपद मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे यावर सत्ताधारी काय निर्णय घेतात ते पाहावे लागेल.

# लातूर जिल्ह्यातील १०३ शेतकऱ्यांच्या तीनशे एकर जमिनीवर वक्फ बोर्डाचा दावा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात एक खळबळजनक प्रकार घडला आहे. तब्बल १०३ शेतकऱ्यांच्या जमिनीवर वक्फ बोर्डने दावा केला आहे.

यामुळे शेतकऱ्यांना जबरदस्त धक्का बसला आहे. सर्व शेतकऱ्यांना वक्फ बोर्डने नोटीस पाठवली आहे. नोटीस आलेल्या शेतकऱ्यांनी सरकारकडे मदत मागितली आहे.

लातूरच्या तळेगावमधील १०३ शेतक-यांना वक्फ बोर्डानं नोटीस पाठवली आहे. लातूर जिल्ह्यातील ३०० एकर जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा केला आहे. वक्फ बोर्डाची संपत्ती इस्लामी काय?द्यानुसार केवळ धार्मिक आणि लोकोपयोगी कामासाठी वापरली जाऊ शकते. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरणानं संभाजीनगर कोर्टात याबाबत याचिका दाखल केली आहे. तर, शेतकरी या विरोधात आक्रमक झाले आहेत. या जमिनी पिढ्यानपिढ्या आपल्याच वहिवाटीखाली आहेत. त्या वक्फ बोर्डाच्या नाहीत असं शेतक-यांनी सांगितले. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला न्याय मिळवून द्यावा अन्यथा आत्महत्येशिवाय आम्हाला पर्याय राहणार नाही असा इशारा शेतक-यांनी दिला आहे.




काही दिवसांपूर्वीच राज्यातील वक्फ बोर्डाला प्रशासनानं GR काढून निधी दिल्याची बाब समोर आली होदती. त्यानंतर मुख्य सचिवांनी तो आदेश मागे घेतला. या प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करुन ही माहिती दिली होती. जेवढा करायचा असेल तेवढा विरोध करा. मात्र संसदेत वक्फ बोर्डाचं विधेयक पारित होणारच असा इशारा अमित शाह यांनी शरद पवारांना दिलाय. तसेच मुंबईतील बांग्लादेशी आणि रोहिंग्यांना मायदेशी पाठवणार असल्याचं विधानही अमित शाहांना केले होते. मुंबईमध्ये बोरिवलीत आयोजित प्रचार सभेत त्यांनी हे वक्तव्य केले होते.

# गणेशपुरीतील प्रसाद चिकित्सा संस्थेतर्फे एड्स जनजागृतीकरिता विविध कार्यक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामिण नरेंद्र पाटील**

एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता वाढवण्यासाठी २ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त प्रसाद चिकित्सा, गणेशपुरी या धर्मादाय संस्थेने विविध उपक्रमांचे आयोजन केले. या उपक्रमांत एड्स जनजागृती विषयी पोस्टर तयार करणे, रांगोळी काढणे व माहितीपर सत्र यांचा समावेश होता, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आणि स्थानिक नागरिकांना एड्सच्या प्रतिबंध आणि उपचाराबाबत जागरूक करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश एचआयव्ही/एड्सच्या प्रतिबंध आणि उपचारांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि समुदायामध्ये आरोग्य शिक्षण व सहभाग वाढवणे हा होता.

या कार्यक्रमांतर्गत आदर्श विद्या मंदिर, डाकीवली शाळेत पोस्टर तयार करण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला. २० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला आणि एचआयव्ही/एड्सविषयी प्रभावी संदेश देणारी पोस्टर्स तयार केली. ही पोस्टर्स प्रसाद चिकित्सा रुग्णालयाच्या प्रतिक्षा कक्षात प्रदर्शित करण्यात आली, ज्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत जागरूकतेचा संदेश पोहोचला. त्याच शाळेत प्रसाद चिकित्सा संस्थेच्या समुपदेशक मनिषा लाटे यांनी विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही/एड्सविषयी माहितीपर सत्र घेतले. या सत्रामध्ये एड्सशी संबंधित गैरसमज दूर करण्यावर, प्रतिबंधक उपायांवर आणि उपचारांच्या पर्यायांवर माहिती देण्यात आली .सरस्वती गणपत पाटील शाळा, केळठण येथील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी काढण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला. २० विद्यार्थ्यांनी पारंपरिक रांगोळी कलेच्या माध्यमातून एड्सविषयी संदेश दिले,

या रांगोळ्या प्रसाद चिकित्सा रुग्णालयाच्या प्रतिक्षा कक्षात प्रदर्शित करण्यात आल्या, मुळे उपस्थित लोकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरल्या. या उपक्रमांतून तयार केलेली पोस्टर्स आणि रांगोळ्या रुग्णालयाच्या प्रतिक्षा कक्षात ठेवण्यातआले. यावेळी विद्यार्थ्यांनी केलेल्या योगदानासाठी त्यांचे कौतुक करण्यात आले.

प्रसाद चिकित्सा संस्थेने राबवलेल्या जागतिक एड्स दिन उपक्रमाने विद्यार्थ्यांना या उपक्रमांत सहभागी करून त्यांच्यात एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता वाढवली. प्रसाद रुग्णालयाच्या माध्यमातून जागरूकतेचा संदेश अधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यात यशस्वी झाले. विद्यार्थ्यांना आणि समुदायाला एड्सविषयी अचूक माहिती दिली गेली आणि सहभागामुळे सकारात्मक वातावरण निर्माण झाले. जागतिक एड्स दिनानिमित्त प्रसाद चिकित्सा संस्थेने राबवलेल्या या उपक्रमांनी एड्सविषयी जागरूकता केली.

## पनवेल महापालिकेची अतिक्रमणविरोधी कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

पनवेल : पनवेल महानगरपालिका प्रशासनाने अनेक महिन्यांच्या विश्रांतीनंतर शहरातील बेकायदा हातगाड्यांवर तोडक कारवाईला मंगळवारपासून सूरुवात केली आहे. बुधवारीसुद्धा पालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कारवाईचे सत्र सूरुच होते. बेकायदा हातगाड्यांवर तसेच अनधिकृत्या बांधलेल्या झोपड्या, दुकानांबाहेर अनधिकृतरित्या ठेवलेल्या सामानांवर ही कारवाई करण्यात आली. पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशांनूसार ही अतिक्रमणविरोधी कारवाई होत आहे. पदपथावर तसेच रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणामुळे नागरिकांना चालण्यास त्रास होण्याच्या अनेक तक्रारी पालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या. तसेच शहरातील हातगाड्यांमुळे वाहतुकीला अडथळे होत आहे. मंगळवारी कळंबोली वसाहतीमध्ये १२ हातगाड्यांवरती तोडक कारवाई करण्यात आली. तसेच पनवेल शहरातील उरण नाका येथील ७ हातगाड्या जप्त करून त्या तोडण्यात आल्या.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी